आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- कर्नाटक, केरळ, छत्तीसगड, हरियाणा आणि मध्य प्रदेशच्या स्थापनादिनानिमित्त प्रधानमंत्र्यांच्या शुभेच्छा

- रेल्वे तिकीट आरक्षणाचे नवीन नियम आजपासून लागू

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध

- महाराष्ट्रात आज लक्ष्मीपूजन, शेअर बाजारात होणार मुहूर्ताचे सौदे

**आणि**

- प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष डॉ बिबेक देबरॉय यांचं निधन

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कर्नाटक, केरळ, छत्तीसगड, हरियाणा आणि मध्य प्रदेशच्या जनतेला या राज्यांच्या स्थापना दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या राज्यातल्या जनतेला आनंद आणि यश प्राप्त होवो अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे.

**कर्नाटकातले** लोक अत्यंत प्रतिभावान असून त्यांनी अनेक क्षेत्रांत विकास आणि नवकल्पना राबवल्या आहेत अशा शब्दात प्रधानमंत्र्यांनी त्यांचं कौतुक केलं आहे.

**केरळही** विलोभनीय नैसर्गिक सौंदर्यासाठी प्रसिद्ध असून हे राज्य आपल्या परंपरा आणि मेहनती जनतेसाठी परिचित असल्याचं ते म्हणाले.

**छत्तीसगड** समृद्ध लोकपरंपरा आणि संस्कृतीचा अनोखा संगम असून विकासाच्या मार्गावर वेगाने प्रगती करत असल्याचं मोदी यावेळी म्हणाले.

**हरियाणा** आपल्या ऐतिहासिक वारशासाठी ओळखलं जात असून देशाच्या विकासात या राज्यानं उल्लेखनीय योगदान दिल्याचं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

**मध्य प्रदेश** नैसर्गिक साधनसंपत्ती आणि सांस्कृतिक वारशानं समृद्ध राज्य असून विकासाच्या प्रत्येक क्षेत्रात या राज्यानं नवीन मानकं प्रस्थापित केल्याची प्रशंसा प्रधानमंत्र्यांनी केली आहे.

**<><><><><>**

रेल्वे तिकीट आरक्षणाचे नवीन नियम आजपासून लागू झाले आहेत. रेल्वेनं याआधी असलेल्या १२० दिवसांच्या आरक्षण कालावधीत कपात करून तो ६० दिवसांवर आणला आहे. मात्र, ३१ ऑक्टोबरपर्यंत झालेली आरक्षणं कायम राहतील अशी माहिती रेल्वेनं दिली आहे. ६० दिवसांच्या आरक्षण कालावधीमुळे तिकिटांच्या उपलब्धतेच्या शक्यता वाढून त्याचा प्रवाशांना थेट लाभ मिळेल असं रेल्वे प्रशासनानं म्हटलं आहे. ६१ दिवस ते १२० दिवसांच्या कालावधीसाठी केलेली तिकीट आरक्षणे प्रवाशांकडून रद्द करायचं प्रमाण २१ टक्के एवढं होत अशी माहीती रेल्वेनं दिली आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकांसाठी वयोगटानुसार मतदार याद्या तयार केल्या आहेत. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी काल एक अहवाल सादर करत सरकारला याबाबत माहिती दिली आहे. यावेळी विधानसभा निवडणुकांसाठी २२ लाखाहून अधिक मतदार १८ ते १९ या वयोगटातले तर ४७ हजार मतदार १०० वर्षांहून अधिक वयाचे आहेत. राज्यात येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

राज्यात एकूण ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार असून यापैकी ५ कोटी २२ हजार ७३९ पुरुष मतदार, ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला मतदार आणि ६ हजार १०० तृतीयपंथी मतदार आहेत.

<><><><><>

भारत आणि इंडोनेशिया लष्कराच्या गरुड शक्ती या सरावाचं नववं सत्र यंदा इंडोनेशियात जकार्ता इथं होत आहे. हे सत्र येत्या १२ नोव्हेंबर पर्यंत सुरु राहील. या संयुक्त सरावात सहभागी होण्यासाठी भारतीय लष्कराची २५ जवानांची तुकडी आज जकार्ताला रवाना झाली. या तुकडीचं प्रतिनिधित्व पॅराशूट रेजिमेंट करत आहे.

दोन्ही देशांच्या लष्कराची कार्यपद्धत समजून घेणं, दोन्ही सैन्याच्या विशेष दलांमध्ये परस्पर सामंजस्य, सहकार्य आणि परस्पर संबंध वाढवणं हे या सरावाचं उद्दिष्ट आहे. या अनुषंगानं या सरावात दोन्ही देशांमधली जीवनशैली आणि संस्कृती समजून घेण्यासोबतच जंगलांमधल्या विशेष संयुक्त मोहिमा, दहशतवादी तळांवर कारवाया, विशेष दलांच्या मूलभूत आणि प्रगत कौशल्यांचा सरावांचं आयोजन, तसंच शस्त्रास्त्र, लष्करी उपकरणं, नवोन्मेष, रणनीती, तंत्र आणि कार्यपद्धतींविषयीच्या माहितीची देवाण घेवाण अशा उपक्रमांचंही आयोजन केलं गेलं आहे.

<><><><><>

नमो ड्रोन दीदी या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्रसरकारने मार्गदर्शक तत्वं जारी केली आहेत. मार्गदर्शक तत्त्वांनुसार, केंद्र सरकारच्या पातळीवर कृषी आणि शेतकरी कल्याण विभाग तसंच ग्रामविकास आणि खतं विभागाच्या सचिवांच्या समिती या योजनेची अंमलबजावणी केली जाणार आहे. या

योजनेअंतर्गत महिला बचत गटांना ड्रोन खरेदी करण्याकरता, ड्रोन आणि त्यासाठी आवश्यक साधनांच्या किंमतीच्या ८० टक्के रक्कमेचं सहाय्य दिलं जाणार आहे, मात्र याची मर्यादा जास्तीत जास्त आठ लाख रुपयां पर्यंत असणार आहे. यासोबतच महिला बचत गटातील एका सदस्याची १५ दिवसांच्या प्रशिक्षणासाठी निवड केली जाईल आणि त्यांना ड्रोन पायलट म्हणून तसचं पोषक आणि कीटकनाशक फवारण्यासंबंधीचं अतिरिक्त प्रशिक्षण दिलं जाईल

<><><><><>

झारखंडमधील विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. या टप्प्यासाठी 634 उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. झारखंडमध्ये, पहिल्या टप्प्याचं मतदान येत्या १३ नोव्हेंबरला तर, दुसऱ्या टप्प्यातील मतदान, 20 नोव्हेंबरला होणार आहे. पहिल्या टप्प्यात ४३ मतदारसंघांत तर, दुसऱ्या टप्प्यात 38 मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नांदेड जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

दीपावलीच्या प्रकाश पर्वानिमित्त देशभरात सर्वत्र उत्साहाचं वातावरण आहे. घरोघरी आकाश कंदील, पणत्या, विजेच्या दिव्यांची आकर्षक रोषणाई, रांगोळ्या,

या बरोबरीनं आप्तजनांच्या भेटीगाठी, फराळाच्या पदार्थांची मेजवानी असं चैतन्याचं वातावरण आहे. महाराष्ट्रात आज संध्याकाळी लक्ष्मी पूजन होणार असून त्यासाठी झेंडूच्या फुलांनी आणि तोरणांनी बाजरपेठा सजल्या आहेत. दिवाळी निमित्त अनेक सामाजिक सांस्कृतिक उपक्रमांचं आयोजनही ठिकठिकाणी केलं जात आहे. महाराष्ट्रात पुणे मुंबईसह सर्वच शहरात दिवाळी पहाट कार्यक्रमांची रेलचेल आहे. अनेक सामाजिक संस्थांमार्फत अन्नदान, वस्त्रदान असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

मुंबईत राष्ट्रीय शेअर बाजार आणि मुंबई शेअर बाजारात आज लक्ष्मीपूजना निमित्त सुट्टी आहे. मात्र व्यापाऱ्यांचं नव वर्ष विक्रम संवत २०८१ च्या प्रारंभानिमित्त आज मुहूर्ताचे सौदे होतील. आज संध्याकाळी पावणे सहा ते सहा या दरम्यान आरंभपूर्व तर संध्याकाळी सहा ते सात या वेळेत मुहूर्ताची सत्र होतील.

**<><><><><>**

जगभरात अनेक देशांमधे दिवाळीचा सण उत्साहात साजरा होत आहे. अमेरिका, इंग्लंडसह संयुक्त अरब अमिरातीमध्येही दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत असून या भारतीय उत्सवाने देशभरातल्या सर्व समुदायांना सामावून घेतल्याचं चित्र दिसत आहे. स्थानिकरित्या 'मिनी इंडिया' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बर-दुबईमध्ये दिवाळीचा उत्साह दिसत आहे. पारंपरिक वस्तूंच्या खरेदी बरोबरच सोन्याच्या बाजारातही लक्षणीय गर्दी दिसून आली. अबू धाबी इथल्या मंदिरांमध्ये विशेष प्रार्थना आयोजित करण्यात आली असून दिवाळीनिमित्त संपूर्ण अमिरातीमध्ये सामुदायिक कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सेवाभावी उपक्रम होत आहेत.

**<><><><>**

आय पी एल अर्थात इंडियन प्रीमियर लीगच्या येत्या २०२५ हंगामासाठी पुन्हा एकदा हार्दिक पांड्याची मुंबई इंडियन्स संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती झाली आहे. २०२४ च्या आय पी एल हंगामासाठी रोहित शर्माच्या जागी त्याला कर्णधारपद दिलं होतं. याआधीही मुंबई इंडियन्सचं प्रतिनिधित्व केलेल्या हार्दिकनं मधल्या काळात गुजरात टायटन्सचा कर्णधार म्हणूनही प्रभावी कामगिरी केली होती. तर रोहित शर्माच्या नेतृत्वात मुंबई इंडियन्सनं पाच वेळा आय पी एल चं विजेतेपद पटकावलं आहे.

**<><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा आणि अखेरचा सामना आजपासून मुंबईत वानखेडे मैदानात सुरु झाला. या सामन्यात नाणेफेक जिंकून न्यझीलंडनं पहिली फलंदाजी करायचा निर्णय घेतला. सकाळच्या पहिल्या सत्रात भारतानं न्यूझीलंडच्या सलामीवीरांसह ३ गडी बाद केले. त्यानंतर यंग विल आणि डॅरिल मिचेल यांनी अर्धशतकी भागिदारी करत न्यूझीलंडचा डाव सावरला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा पहिल्या डावात न्यूझीलंडच्या ५ बाद १५९ धावा झाल्या होत्या.

या मालिकेतले पहिले दोन्ही सामने जिंकून न्यूझीलंडनं २-० अशी आघाडी घेतली आहे.

**<><><><>**

\प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष डॉ बिबेक देबरॉय यांचं काल नवी दिल्ली इथं निधन झालं. ते एकोणसत्तर वर्षांचे होते. प्रकृती

अस्वास्थ्यामुळं कालच त्यांना दिल्लीच्या एम्स रुग्णालयात भर्ती केलं होतं. देबरॉय पूर्वी नीती आयोगाचे सदस्य होते तसंच अर्थमंत्रालयाच्या पायाभूत सुविधा आणि वित्तपुरवठा विषयक तज्ञ समितीचे अध्यक्ष होते. २०१५ मधे त्यांना पद्मश्रीने सन्मानित करण्यात आलं होतं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बिबेक देबरॉय यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. देबरॉय थोर विचारवंत आणि अभ्यासक होते. तसंच युवकांच्या दृष्टीकोनातून त्यांनी भारतीय संस्कृतीचं आकलन मांडलं होतं, असं प्रधानमंत्र्यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे.

**//<><><><><>//**